REVIEW OF RESEARCH

वि. वा. शिरवाडकर - एक साहित्यिक कोलंबस

प्रा. डॉ. संजय कुलकर्णी

मराठी विभागप्रमुख, जवाहर महाविद्यालय अणदूर,
ता. तुळजापूर, जि. उस्मानाबाद.

ISSN: 2249-894X
IMPACT FACTOR : 5.7631(UIF)
UGC APPROVED JOURNAL NO. 48514
VOLUME - 8 | ISSUE - 8 | MAY - 2019

महाराष्ट्राचे भूषण, मराठीतील श्रेष्ठ व जेष्ठ साहित्यिक श्री. वि.वा. शिरवाडकर उर्फ कुसुमाग्रज यांना सन १९८७ या वर्षीचा ज्ञानपीठ पुरस्कार मिळाला. आखिल मराठी भाषिकांचा, महाराष्ट्रातीलच नव्हे तर महाराष्ट्राबाहेरील व भारतातील व भारताबाहेरील मराठी भाषिकांचा आणि तात्यासाहेब शिरवाडकरांच्या साहित्यनिर्मितीवर प्रेम करणाऱ्या सर्वांचा हा गौरव आहे. १९७४ साली वि.स. खांडेकरांना ज्ञानपीठ पुरस्कार मिळाला. त्यानंतर तो मान कुसुमाग्रजांना प्राप्त झाला आहे. विविधतेतून राष्ट्रीय एकात्मता अधिक बळकट करण्यास हा पुरस्कार निश्चितच हातभार लावतो. तात्यासाहेब शिरवाडकर यांनी मराठी साहित्यात मोलाची भर घातली आहे. त्यांच्या कवितांतून व्यक्त झालेली कोमल प्रेमभावना, स्वातंत्र्याची अदम्य आकांक्षा, क्रांतीचा उद्दाम आवेश, अन्याया विरूद्धची तीव्र चीड व समाजपरिवर्तनाची ईर्षा या साऱ्यांनी मराठी रसिकांचे भावजीवन सुसंस्कृत व समृद्ध बनवले आहे. कवितेप्रमाणेच नाटकांतही त्यांच्या प्रतिमेची असाधारण झेप रसिकाला थक्क करते. या प्रतिभेने कविता, नाटक याबरोबरच कादंबरी, कथा, ललित लेख इत्यादी साहित्य प्रकारातूनही जीवनाच्या विविध क्षेत्रातील व विविध पातळीवरील अनुभव समर्थपणे साकार केले आहेत. प्रतिभाशाली साहित्यिक म्हणून तात्यासाहेब श्रेष्ठ आहेतच. पण त्यांच्या साहित्याइतकेच त्यांचे व्यक्तिमत्त्वही सुसंस्कृत व सोज्वळ आहे. ज्यांच्यासमोर आदराने व प्रेमाने नमावे व आशीर्वाद घ्यावे अशा फार थोड्या व्यक्ती आपल्या सार्वजनिक जीवनात आहेत. त्यापैकी एक तात्यासाहेब होते.

साहित्यिक कोलंबस :-

कविता, नाटक, कांदबरी, कथा आदी विविध साहित्य प्रातांत नवे विचार, नवे मूल्ये, नवनव्या भावना-कल्पना या सातत्याने शोध घेणारे कवी कुसुमाग्रज हे 'साहित्यिक कोलंबस' होते. तात्यासाहेब म्हणजे जीवनावर व समाजावर प्रेम करणारे तपस्वी होते. ते केवळ प्रतिभावंत नाहीत, तर समाजजीवनाशी समरस होणारे व सामाजिक बांधिलकी असलेले विचारवंतही होते. साहित्यिकाच्या पदाला पोहचणारे शिरवाडकर एक सामान्य माणूस म्हणून आपल्या जीवनात अडचणीशी व अडथळ्यांशी सतत झगडत आले आहेत. सामान्य माणसाच्या वाट्याला येणारे सुखदु:खाचे व आपत्तीचे क्षण त्यांनी अनुभवले आहे. तात्यासाहेबांची श्रद्धा आणि निष्ठा केवळ विशिष्ट वैचारिक मूल्यांवर आधारित नाही तर जीवनमूल्य घडविणाऱ्या माणसांवर त्या आधारित आहेत. माणसातील 'माणूसपणा' बद्दल त्यांना आकर्षण आहे. माणूस म्हणून माणसाचा विचार न करणारे कोणतेही तत्वज्ञान त्यांनी कधीच स्वीकारले नाही. वि.वा. शिरवाडकरांच्या साहित्यनिर्मितीच्या प्रेरणाही अशाच मूलत: माणसाच्या माणूसकीचा शोध घेणाऱ्या व तिला समर्थ करु पहाणाऱ्या आहेत. उत्कट व भव्य सौंदर्याबरोबरच दारिद्र्य रेषेखाली राहणारा या देशातील पददलित समाज हे सुद्धा शिरवाडकरांच्या साहित्याचे महत्त्वाचे स्फूर्तीस्थान आहे. मराठी संस्कृतीशी, तसेच राष्ट्रीय स्वातंत्र्य व विचार स्वातंत्र्य आणि समता व बंधुत्व या मूल्यांशी तात्यासाहेबांचे अतूट नाते आहे. गांधीवादी तत्वज्ञानानी तात्यासाहेब प्रभावित झाले होते. या सर्व प्रवाहांनी त्यांची विचारधारा पुष्ट झाली होती. नवी समाजरचना, नैतिक मूल्य, दलितांचा मुक्ती संघर्ष या सगळ्यांबाबत तात्यासाहेबांचे विचार निश्चित आहेत. एक उदार, सहिष्णु व संवेदनशील मनाची ती स्पंदने आहेत. साहित्याचा सामाजिकतेशी अतूट संबंध आहे. याबाबत त्यांची निश्चित भूमिका आहे. साहित्याला समाजातील दुर्बल घटकांची जाणीव पाहिजे. कारण साहित्याला निसर्ग, सृष्टीसौंदर्य याबरोबरच सामाजिक प्रक्षोभही तेवढेच महत्त्वाचे आहेत. प्रेम,

परमेश्वर याप्रमाणेच एखादे सामाजिक तत्वज्ञानही श्रद्धेचा विषय होऊ शकतो. हे माननारे शिरवाडकर नीती-अनीतीच्या विचाराबाबतही क्रांतिकारक विचार बाळगणारे होते. प्रचलित समाज प्रवाहाशी समरस होणारे तात्यासाहेबांचे मन वेळोवेळी प्रसंगानुरुप व्यक्त झाले आहे. यातूनच 'गर्जा जयजयकार' ही स्वातंत्र्य चळवळीतील सैनिकांना स्फूर्ती देणारी त्यांची कविता निर्माण झाली आणि स्वातंत्र्योत्तर काळात तेच संवेदनशील मन 'दारिद्रतेच्या अपमानांनी, पदापदावर पिचते छाती' म्हणून सामाजिक विषमतेमुळे व्याकुळ झालेले दिसते. मराठी मन, सुसंस्कृत व संवेदशील करण्याचे व त्याच्या जाणीवेच्या कक्षा विशाल करण्याचे कार्य शिरवाडकरांनी आपल्या साहित्यातून केले आहे.

साहित्याचे फलित - सत्यम् शिवम् सुंदरम् :-

वि.वा. शिरवाडकरांचे एकूणच साहित्याचा विचार करता त्यांच्या साहित्याचे फलित 'सत्यम् शिवम् सुंदरम्' असल्याचे जाणविते. ११ मार्च, १९८९ रोजी मुंबई येथे त्यांना ज्ञानपीठ पुरस्कार प्रदान करण्यात आला. याप्रसंगी त्यांनी जे मनोगत व्यक्त केले. त्या प्रसंगी ते म्हणतात, 'काव्याचे आणि पर्यायाने सर्व साहित्याचे फलित सत्यम् शिवम् सुंदरम् या उक्तीत सामावले आहे. काव्य हे अखेरत: सुंदराचा शोध घेते, शिवाचे रक्षण करते आणि सत्याची साधना करते आणि हे सर्व करताना जे असुंदर आहे, अशिव आहे, असत्य आहे त्याच्याशी मुकाबला करीतच त्याला पुढे जावे लागते. म्हणून माणसाला उत्कट अनुभूतीचे जेवढे क्षेत्र आहेत. ते सर्व काव्याचेही क्षेत्र आहेत. काव्याच्या दृष्टीने सागराची अथांगता जेवढी खरी तेवढीच खरी अश्रुची अगतिकताही, डोंगर जेवढा खरा तेवढाच खरा सामाजिक व्यवस्थेतील अन्यायही, नक्षत्रांचे आमंत्रण खरे तेवढेच खरे उपासमारीचे आंक्रदनही, प्रणयाच्या स्पर्शाइतकीच महारोग्याची बधिरलेली नि:स्पर्शताही खरी.' यामधून शिरवाडकरांच्या साहित्याचे, जगण्याचे जाण आणि भान व सामाजिक दृष्टिकोण आपल्या लक्षात येतो. साहित्यिक, कवी हा समाजात जगत असतो आणि त्या समाजजीवनाच्या जाणिवा त्यांच्या आत्मतेत समाविष्ट होत असतात. माणसाची संस्कृती म्हणजे अंधार आणि प्रकाश यांच्यातील चिरतंन संर्घषाचा इतिहास आहे. न्याय अन्यायाची, सुंदर-असुंदराची, शिवाशिवाची जाणीव असलेली काव्यशक्ती प्रकाशाच्या बाजूने उभी राहते आणि म्हणूनच सामाजिक विकासाची सहचरी होऊ शकते असेही ते म्हणतात.

शिरवाडकरांनी कथा, कादंबरी, ललित निबंध हे गद्यप्रकार हाताळले पण विनोद स्वतंत्रपणे हाताळला नाही. त्यांच्यात तो गुण आहे. याची उत्तम प्रचिती 'आमचं नाव बाबुराव' सारख्या नाटकात येते. नाटक म्हटले की, 'नटसम्राट' चे नाव घ्यावेच लागते. कथा, कादंबरी लिहिताना त्यांच्यातला कवी सतत डोकावतो. तसाच तो नाटक लिहिताना डोकावतो. हा कवी तत्वचिंतक आहे. मानवी जीवनातील विषमता, दु:ख, दारिद्र्य, अन्याय यांनी व्यथित होणारा आहे. चिडणारा आहे. मात्र ती चीड तो आक्रस्ताळेपणाने नव्हे, सूचक, धारदार, उपरोधिक शब्दांत व्यक्त करणारी आहे. 'नटसम्राट' हे त्याचे सर्वात यशस्वी उदाहरण होय. शिरवाडकरांनी त्यांच्या नाट्यकृतीच्या पात्रामधून मानवी जीवनाचे तत्वज्ञान साध्या भाषेत सांगतात. उदा. १) माणूस किती जगतो हे महत्त्वाचे नाही, कसं जगतो हे महत्त्वाचे आहे. शंभर फुटांच्या वाळवंटापेक्षा दहा फुटांची फुलबाग चांगली. २) सुर्याचे दु:ख कोणते तर त्याला काळोख पहाता येत नाही. सोन्याचे दु:ख कोणते तर त्याला संतसहवास मिळत नाही. कवीचे दु:ख कोणते तर त्याला सांगायचे ते मधीच सांगता येत नाही. ३) पृथ्वी सुर्याभोवती फिरत नाही. ती रुपयाच्या नाण्याभोवती फिरते अशी अनेक जीवनावरील भाष्य व्यक्त करणारी वाक्ये त्यांच्या साहित्यकृतीत दिसून येतात. त्यातून त्यांच्या साहित्यांची व विचारांची श्रीमंती आपणास जाणवते. नुसते जाणवितेच नाही तर ती आपणास विचार करावयास लावते. असा हा जीवनाशी नाते सांगणारा श्रेष्ठ आणि जेष्ठ साहित्यिक आहे. अशा मोठ्या साहित्यिकांच्या साहित्याचे आपण विश्लेषण ते काय करणार ? पण मला जाणविलेल्या शिरवाडकरांसाठीचे हे अल्प प्रयत्न.

संदर्भ

१) 'विशाखा' वि.स. खांडेकरांनी लिहिलेली प्रस्तावना
२) काळे अक्षयकुमार, कविता कुसुमाग्रजांची, साहित्य प्रसार केंद्र, नागपूर, १९८६
३) देशमुख उषा, कुसुमाग्रज साहित्यदर्शन, शलाका, मुंबई, १९८९
४) देशमुख शोभना, शिरवाडकरांची नाटके, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे, १९८४
५) पाटील गो. तु. (संपा), नटसम्राट : समीक्षा, चेतश्री प्रकाशन, अमळनेर, १९८६
६) दै. लोकमत, मंथन पुरवणी, सोलापूर, २०११